MHAH080015062014

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ११३/२००० मधील नि. १८४–अ वरील आदेश**

*(आण्णा पंढरीनाथ लेंडे **विरुध्द** गणपत बाबुराव लेंडे व इतर)*

*(दिनांक ०७/०७/२०२५ रोजी)*

सदरचा दावा वादी यांनी वाटपासाठी, निरंतर मनाई आदेशासाठी, जाहिर ठराव व दरम्यानचे उत्पन्न मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. सदरच्या दाव्यात वादींनी विनंती कलम ७–क(क) नुसार दावा मिळकतीपैकी जमिनीचे खरेदी खत रजि. नं. ३६३३/२०१३ आणि ३६४१/२०१३ असे दि. १०/०५/२०१३ रोजीचे दोन खरेदीदस्त बेकायदेशिर असुन ते वादींवर बंधनकारक नसल्याचा जाहिर ठराव मिळण्याची मागणी केली आहे. सदर खरेदीदस्ताच्या मुळ प्रती प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांच्या ताब्यात असुन सदर मुळ दस्त प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांनी अभिलेखावर हजर करण्यासाठी वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ११ नियम १४ नुसार निशाणी १६६ अन्वये अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज दि. २१/१२/२०२२ रोजी मंजुर होऊन त्यावर प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांनी खेरदीखत नोंदणी क्र. ३६३३/२०१३ व ३६४१/२०१३ हे दस्त अभिलेखावर दाखल करणेबाबत प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांना आदेशित करण्यात आले. परंतु, प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांनी सदर आदेशानुसार दस्तांच्या मुळ प्रती अभिलेखावर दाखल केल्या नाही. त्यामुळे वादीतर्फे त्यांनी १८४–अ अन्वये सदर वादींना सदर दस्तांचा दुय्यम पुरावा दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी सदर अर्ज दाखल केला आहे.

०३. **नि.१८४–अ** वरील वादींच्या अर्जावर प्रतिवादी क्र.१ व २ तसेच १२ ते १४ यांनी म्हणणे दाखल केले असुन प्रतिवादी क्र. ३ ते ५ व १५ यांनी कोणतेही म्हणणे दाखल केले नाही. प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांनी सदर अर्जावर योग्य तो हुकुम करण्यात यावा असे म्हणणे दाखल केले असुन प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी सदर दस्तांची सत्यप्रत मिळवु शकतात व भारतीय पुरावा कायद्यानुसार दुय्यम पुरावा शाबीत केला जाऊ शकतो. परंतु, वादी प्रतिवादींना त्रास देण्यासाठी मुद्दाम अशा स्वरुपाचे अर्ज देत आहेत. सबब, अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांना युक्तिवाद ऐकला. वादीने सदर अर्जानुसार अर्जामधील नमुद दस्तांच्या मुळ प्रती प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांनी हजर कराव्यात अशी विनंती करुन निशाणी १६६ अन्वये दाखल केलेल्या अर्जातील ओदशानुसार प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांना भारतीय पुरावा कायदा कलम ६५(अ) मधील तरतुदीनुसार जेव्हा मुळ दस्त हा प्रतिवादी किंवा ज्या व्यक्तीच्या विरोधात शाबीत करण्याचा आहे त्या व्यक्तीच्या ताब्यात असेल आणि भारतीय पुरावा कायदा कलम ६६ नुसार सदर व्यक्तीस सदर मुळ दस्त सादर करणेबाबत नोटीस किंवा सुचना दिल्यानंतर देखील सदर व्यक्ती मुळ दस्त दाखल करत नाही त्यावेळी सदर दस्ताचा दुय्यम पुरावा दिला जाऊ शकतो.

**०५.** प्रस्तुत दाव्यामध्ये निशाणी १६६ वरील आदेशानुसार प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांना सुचना वजा नोटीस दि. २१/१२/२०२२ रोजी दिल्यानंतर देखील प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांनी मुळ दस्त दाखल केले नाही. त्यामुळे भारतीय पुरावा कायदा कलम ६५(अ) नुसार वादी सदर दस्ताचा दुय्यम पुरावा दाखल करण्यास पात्र ठरतात. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

**<u>–आदेश–</u>**

१. अर्ज (**नि.१८४–अ**) मंजूर करण्यात येतो.

२. वादीस अर्जातील नमुद दस्तांचा दुय्यम पुरावा दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

स्वाक्षरीत/–

(श्रीमती एस. बी. ढवळे.)

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.

संगमनेर.

दि. ०७/०७/२०२५.